(CNR NO. MHAH-20-000002-2011)

<u>नियमित दिवाणी दावा क्र. २३३/२०११ मधील नि.क्र. ८९ वरील आदेश</u>
<u>नंदकिशोर लाहोटी वि. सौ. दिप्ती गांधी वगैरे २.</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र.२ सरला केदारनाथ लाहोटी यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे अर्जातील संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे :-

वादीने प्रतिवादींविरुध्द वाद मिळकती बाबत निरंतर ताकिदीकरीता दावा दाखल केला आहे. दावा न्यायप्रविष्ट असताना प्रतिवादी क्र.२ सरला केदारनाथ लाहोटी या दिनांक २९/११/२०१५ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जात नमूद पक्षकार हे मयत प्रतिवादी क्र. २ सरला केदारनाथ लाहोटी यांचे कायदेशिर वारस आहेत. त्यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामिल करणे आवश्यक आहे. त्यामूळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. करिता हा अर्ज.

३. अर्जात नमूद वारसांना जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे नोटीस काढण्यात आली परंतू, ते हजर झाले नाही. प्रतिवादींनी आपले म्हणणे देऊन अर्ज मंजूरीस आक्षेप घेतला की, अर्ज मुदतीत व कायदेशीर नाही. सदर दावा हा मनाई हुकूमाचा असल्याने दाव्यातील कॉज ऑफ ॲक्शन संपूष्टात आलेले आहे. जर प्रतिवादी क्र. २ या मयत आहेत तर तिचेतर्फे ती इतरांमार्फत वादीस हरकत अडथळा कशी काय करु शकते. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे म्हणणे दिले.

४. वादी यांनी अर्जाचे पृष्टयर्थ शपथपत्र नि.क्र.९० वर सादर केले. प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्याच्या पृष्टयर्थ शपथपत्र दाखल केले नाही. प्रतिवादी क्र. २ यांचे मुत्यु प्रमाणपत्र नि.क्र.९२ समवेत आहे. हे मृत्यू प्रमाणपत्र दिनांक १४/०१/२०१६ रोजी मिळाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा दावा हा अचल संपत्तीबाबत निरंतर ताकीदीचा आहे.

५. दावा न्यायप्रविष्ट असताना प्रतिवादी क्र. २ सरला केदारनाथ लाहोटी या मयत झाल्या, याबाबत उभय पक्षात दुमत नाही. दाव्यातील कथन सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर

/२/

आहे.  अर्जातील नमूद कारण पाहता वादींनी केलेल्या विनंतीप्रमाणे दुरुस्ती आवश्यक असल्याचे दिसून येते.  जरी दावा दुरुस्त केला तरी दाव्याचे स्वरुप बदलत नाही.  वादीची जी मागणी आहे तिच मागणी कायम रहाते. तसेच प्रतिवादींच्या बचावातही फरक पडत नाही.  प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व न्यायाच्या दृष्टीने व अर्जातील नमूद कारण पाहता अर्ज मंजूरीस सबळ कारण दिसते. करीता आदेश.

**<u>आ दे श..</u>**

१. अर्ज नि.क्र. ८९ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी नि.क्र. ८९ मध्ये विनंती केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती पुढील तारखेपर्यत किंवा त्यापूर्वी करावी.

३. वादी यांनी या अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रुपये ३००/- प्रतिवादी यांना पुढील तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी द्यावेत.

Sd/- x x x
( सु.श. देशमुख )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पाथर्डी.

दिनांक : २१/०१/२०२०.